**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – सुहास गंगाराम पांचाळ
वय – ४३ वर्षे.
व्यवसाय – पोलीस हवालदार ६४८
रा/ने – मालवण पोलीस स्टेशन, ता. मालवण जि. सिंधुदूर्ग.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोगत्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू</u>**

१. दि. ०८/०२/२०२१ रोजी माझी नेमणूक मालवण पोलीस स्टेशन येथे ठाणे अंमलदार म्हणून होती. ठाणे अंमलदार या नात्याने येणारी तक्रार नोंद करुन घ्यावी लागते. सदर दिवशी वैभव बाळकृष्ण मयेकर रा. धुरीवाडा मालवण पोलीस स्टेशन येथे चंद्रकांत प्रभू, गौरव प्रभू, बाबू ढोके, अमित आडवलकर, अमोल आडवलकर, सुमित सावंत व गोपी मालवणकर यांचेविरुध्द तक्रार द्यायला आला होता. वैभव मयेकर यांचा असे म्हणणे होते की, सतिश आचरेकर यांच्याबरोबर स्कुबा डायव्हींगचा व्यवसाय आहे. त्या कारणावरुन आरोपींशी त्यांचे वाद होत होते. दि. ०३/०२/२०२१ रोजी फिर्यादी रात्री ११.३० वा. गारुडेश्वर मंदिर धुरीवाडा येथे असताना आरोपी क्र. १ ते ७ त्या ठिकाणी आले होते. आरेपींनी फिर्यादीस सांगितले की, मादरचोद तुझा धंदा वाढला आहे काय. आरोपींनी शिवीगाळ व मारुन टाकण्याची धमकी दिली. गौरव प्रभु व चंद्रकांत प्रभु यांनी फिर्यादीची कॉलर पकडून धकलाबुकल केली व तक्रार केलीस तर मारणार असे सांगितले.

२. दि. ०४/०२/२०२१ रोजी सायंकाळी ४.०० वा. सुमारास फिर्यादी हे मालवण जेटी येथील त्यांच्या मरिन ड्राईव्ह स्कुबा सेंटर येथे असताना तेथे चंद्रकांत प्रभू, गौरव प्रभु, बाबू ढोके व अमित आडवलकर हे त्या ठिकाणी आले. तू सतिश आचरेकरसोबत काम करायचे नाही असे सांगितले. आजपासून स्कुबा डायव्हींगचा धंदा

सोडून दे असे सांगून धमकी दिली. त्यावेळेस चंद्रकांत प्रभूच्या हातात दांडा होता. ते पाहून त्या ठिकाणी सतिश आचरेकर तेथे आले. त्यांनी मध्यस्थी करुन प्रकरण मिटवले. त्यानंतर चौघे आरोपी सतिश आचरेकर यांचा भाऊ आनंद आचरेकर यांच्या कोल्ड्रींग हाऊस दुकानात गेले. त्या ठिकाणी आनंदची आई व आनंद आचरेकर यांच्याशी वादविवाद केला. तुम्ही मच्छीमार आहात, तुम्ही मच्छीमारीच करा असे वक्तव्य करुन शिवीगाळ केली. चंद्रकांत प्रभू व गौरव प्रभू यांनी आनंदच्या आईला धक्काबुक्की केली. तसेच त्यांच्याकडील चैन परत आणून देतो असे सांगून घेवून गेले अशी हकीगत आनंदकडून फिर्यादीला समजली.

३. दि. ०६/०२/२०२१ रोजी सायंकाळी ६.०० वा.च्या सुमारास फिर्यादी हा त्यांच्या धुरीवाडा येथील घरी हजर असताना आरोपी क्र. १ ते ७ हे दोन काळया रंगाच्या मोटरसायकलवरुन तेथे आले. ते फिर्यादीला पाहून शिवीगाळ करु लागले. ते फिर्यादीच्या मागोमाग येवू लागले म्हणून फिर्यादी घरात गेला. आरोपींनी फिर्यादीला ' रांडेच्या, तू गाव आमका, तुका संपवताव ' अशी धमकी दिली. त्यावेळेस फिर्यादीची आई व बहिण घरातून बाहेर आली. त्यांनी शिवीगाळ कशाला करता असे विचारले. त्यावेळी गौरव प्रभू चंद्रकांत प्रभू यांनी फिर्यादीची आई व बहिणीला ढकलले व घरात जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळेस तेथे लोक जमले म्हणून तेथून आरोपी निघून गेले.

४. वरील सर्व घटनेची हकीगत फिर्यादीने मला सांगितली. फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी फिर्यादीची नोंदवून घेतली व गुन्हा दाखल केला. साक्षीदारास दि. ०८/०२/२०२१ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यातील मजकूर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे. त्यावर माझी फिर्यादीची सही आहे. फिर्यादीने माझ्या समक्ष सही केल्याने मी त्याची सही ओळखतो. सदर फिर्यादला **नि.क्र.पी१/पीडब्ल्यू३** देण्यात येते. तसेच छापील एफआयआरला

**नि.क्र.पी२/पीडब्ल्यू३** देण्यात येते. त्यानंतर फिर्यादीला यादी देवून मेडीकलसाठी पाठविले.

सरतपास पुर्ण.

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. एच.आर.गरगटे यांचेमार्फत**

आरोपी तर्फे दाखल नि.क्र. ७४ वरील आदेशान्वये साक्षीदाराचा उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह
दि. २४/०२/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग – १ मालवण.